PAGE No.
DATE / /

## ॥ विचार ॥

उगम हे मन, वाहन हे मन
योजने उड्डाण, विचारांचे ॥१॥

विचारे ते पाप, विचारे संताप
शिगोशीग माप, संतोषाचे ॥२॥

दयाळू विचार, प्रेमळ विचार
अधम विचार, क्रूरतेचे ॥३॥

विचार मायावी, विचार प्रभावी
विचारे लाभावी प्रसन्नता ॥४॥

आधी स्फुरतो विचार, मग घडतो आचार
वाहू किती भार, द्वंद्व मनी ॥५॥

वाहे सैरावैरा, जणू उधाणला वारा
योग ध्यान करा, शांतवाया ॥६॥

नका करू भ्रांत, झोप घ्यावी शांत
स्थिरावे आकांत, विचारांचा ॥७॥

संवाद हा साचा, कृष्णार्जुनाचा
गीतासार वाचा, ज्ञानाच्या विचारा ॥८॥

धनश्री श्रेयस यादव.
९८२३९८२६०९

व्हिडिओ पहा